सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - १०/२०२४-२०२५

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **बुधवार दि.०९/१०/२०२४ रोजी दुपारी ०४.३० वाजता महानगरपालिका मुख्यालय येथील कै.राजाभाऊ हरिभाऊ जगदाळे सभागृह, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१०३ ते ११६

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.३०/०९/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.९,स.नं.६३५४/२४५ व ६२५४/२४६ या मनपा ओपन स्पेसला आमदार सुधीर दादा गाडगीळ क्रिडा प्रबोधिनी असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.०८/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

३. महानगरपालिका क्षेत्रातील उत्कर्ष हडको कॉलनी स.नं.२५२ नविन स.नं.१९/१ या मनपा ओपन स्पेसला उत्कर्ष बालोद्यान असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.०८/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

४. सर्व साधारण प्रशासक ठराव क्र.०९ दि.०९/१०/२०२३ नुसार झालेला निर्णय रद्द होवून प्रचलित पद्धतीनुसारच देयके तयार करुन नागरिकांना वितरीत करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता कर व इतर) यांचे दि.०८/१०/२०२३ रोजीचे विषयपत्र.**

५. पाणी पुरवठा विभाग सांगली व मिरज विभागाकडे नियमित जलशुद्धीकरण केंद्र चालविणे, पंप हाऊस फिल्टर हाऊस विभागाकडील दुरुस्त्या, पाईप लाईन्स टाकणे बोअर मारुन पाणी सोय करणे, व्हॉल्व बदलणे / बसविणे मोठ्या स्वरुपातील गळत्या दुरुस्त्या,पाणी पुरवठा सुधारणा विषयक कामे करणे इत्यादी पाणी व्यवस्था बाबतची कामे केलेल्या ठेकेदारांची १५ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून थकित देयके आदा होणेसाठी तरतुद करणे व पाणी पुरवठासाठी TIED grant चा आराखड्यास मान्यता देणेकामी **उपायुक्त मुख्यालय (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०८/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

१२१ ६. सन २०२३-२४महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील एकूण र.रु.१०,००,००,०००/- मात्रच प्रस्तावातील काम क्र.१६,१७,३०, व ३३ या र.रु.१.०५ कोटींची कामे रद्द करुन, विषयपत्रातील नमुद सहा कामांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीस्तव सादर करणेस मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०९/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

१२३ ७. केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई-बस सेवा योजने अंतर्गत सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेस मंजूर झालेल्या इलेक्ट्रीक बसेस परिचलन करण्याकरीता ई-बस सेवा बस डेपोचे बांधकाम व विद्युतीकरणाचे काम करणे कामी र.रु.१४.०० कोटी मात्रची महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पामध्ये नवीन लेखाशिर्ष निर्माण करुन तरतुद करणेस **अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०९/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १०/२०२४-२५ दिनांक :- ०९/१०/२०२४ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण प्रशासक सभा क्र.१० दि.०९/१०/२०२४ रोजी महानगरपालिका मुख्यालय येथील कै.राजाभाऊ हरिभाऊ जगदाळे सभागृह, सांगली येथे दुपारी ०४:३० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक सर्वसाधारण सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.शुभम गुप्ता - प्रशासक	१२.	श्री.तेजस शहा - ज्य.इंजि.वर्कशॉप
२.	श्री.रविकांत आडसुळ - अतिरिक्त आयुक्त,मिरज	१३.	श्री.आनंदा वाघमारे – नगर अभियंता नादानिक
३.	श्रीमती विजया यादव - मालमत्ता व्यवस्थापन	१४	श्री.शंकर भंडारी - ग्रंथपाल
४.	श्री.पृथ्वीराज चव्हाण -शहर अभियंता	१५.	श्री.धनंजय हर्षद-जनसंपर्क/ मालमत्ता अधिक्षक
५.	श्री.शिरिष धनवे - मुख्य लेखापरिक्षक	१६.	श्री.नकुल जकाते - सिस्टीम मॅनेजर
६.	श्री.रविंद्र ताटे - वै.आ.अधिकारी, सार्व.आरोग्य	१७.	श्री .सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी
७.	श्री.वैभव पाटील - वै.आ.अधिकारी वैद्य.सेवा	१८.	श्री.विनायक जाधव – ज्य.इंजि.वर्कशॉप,मिरज
८.	श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी आस्थापना	१९.	श्री.समीर जमादार - विधी विभाग अधिकारी
९.	श्री.चिदानंद कुरणे- जल./पापु.अभियंता, सां./मि.	२०.	श्री.सुनिल पाटील – विशेष कार्य.अधिकारी
१०.	श्री.सहदेव कावडे - सहा.आयुक्त १/ नगरसचिव	२१.	श्री.ज्योती सर्वदे - NULM
११.	श्री.अनिस मुल्ला- सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४	२२.	श्री.गुजराथी – पर्यावरण अभियंता

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१	मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.३०/०९/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ०२	महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.९,स.नं.६३५४/२४५ व ६२५४/२४६ या मनपा ओपन स्पेसला आमदार सुधीर दादा गाडगीळ क्रिडा प्रबोधिनी असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.०३	महानगरपालिका क्षेत्रातील उत्कर्ष हडको कॉलनी स.नं.२५२ नविन स.नं.१९/१ या मनपा ओपन स्पेसला उत्कर्ष बालोद्यान असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र.०४	सर्व साधारण प्रशासक ठराव क्र.०९ दि.०९/१०/२०२३ नुसार झालेला निर्णय रद्द होवून प्रचलित पद्धतीनुसारच देयके तयार करुन नागरिकांना वितरीत करणेस मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.०५	पाणी पुरवठा विभाग सांगली व मिरज विभागाकडे नियमित जलशुद्धीकरण केंद्र चालविणे, पंप हाऊस फिल्टर हाऊस विभागाकडील दुरुस्त्या, पाईप लाईन्स टाकणे बोअर मारुन पाणी सोय करणे, व्हॉल्व बदलणे / बसविणे मोठ्या स्वरुपातील गळत्या दुरुस्त्या,पाणी पुरवठा सुधारणा विषयक कामे करणे इत्यादी पाणी व्यवस्था बाबतची कामे केलेल्या ठेकेदारांची १५ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून थकित देयके आदा होणेसाठी तरतुद करणे व पाणी पुरवठासाठी TIED grant चा आराखड्यास मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.०६	सन २०२३-२४महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील एकूण र.रु.१०,००,००,०००/- मात्रच प्रस्तावातील काम क्र.१६,१७,३०, व ३३ या र.रु.१.०५ कोटीची कामे रद्द करुन, विषयपत्रातील नमुद सहा कामांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीस्तव सादर करणेस मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजूर

... २ ...

विषय क्र.०७	केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई-बस सेवा योजने अंतर्गत सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेस मंजूर झालेल्या इलेक्ट्रीक बसेस परिचलन करण्याकरीता ई-बस सेवा बस डेपोचे बांधकाम व विद्युतीकरणाचे काम करणे कामी र.रु.१४.०० कोटी मात्रची महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पामध्ये नवीन लेखाशिर्ष निर्माण करुन तरतुद करणेस मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर

येणेप्रमाणे सभेचे कामकाज सर्व उपस्थित अधिकारी यांच्या सहमतीने पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- ०९/१०/२०२४

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १०/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ११७ **दिनांक :- ०९/१०/२०२४**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.३०/०९/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१०३ ते ठराव क्र.११६ चे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(सुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १०/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ११८ **दिनांक :- ०९/१०/२०२४**

विषय क्रमांक :- ०२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.०८/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.९,स.नं.६३५४/२४५ व ६२५४/२४६ या मनपा ओपन स्पेसला आमदार सुधीर दादा गाडगीळ क्रिडा प्रबोधिनी असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिक्षक

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १०/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ११९ **दिनांक :-** ०९/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.०८/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील उत्कर्ष हडको कॉलनी स.नं.२५२ नविन स.नं.१९/१ या मनपा ओपन स्पेसला उत्कर्ष बालोद्यान असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिक्षक

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १०/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १२० **दिनांक :-** ०९/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मालमत्ता कर व इतर (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०९/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या पाणीपट्टी विभाग कार्यक्षेत्रातील नागरीकांचे पाणी मीटर बंद स्थितीत असल्याने सरासरी प्रमाणे पाणी बीले दिली जातात. याचा विचार करुन सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रं.०९ दि.०९/१०/२०२३ अन्वये ज्या ग्राहकांचे १ महिन्यापेक्षा जास्त काळ मिटर नादुरुस्त असल्यास अशा पाणी मिटर धारकांना मिटर दुरुस्त करुन सुव्यवस्थेत आणेपर्यंत किमान आकारणी अथवा मिटर सुव्यवस्थित असतानाची आकारणी याच्या दुप्पट दराने पाणीपट्टी आकारणी करणे बाबत ठराव पारीत करण्यात आला आहे.

तसेच सदर ठरावच्या अनुषंगाने उपायुक्त (मालमत्ता व कर) यांनी नागरीकांना दि.३० एप्रिल २०२४ अखेर स्वखर्चाने पाणी मीटर बदलुन न घेतल्यास चालु वर्षाचे पाणी बील हे दुप्पट दराने आकारणेत येईल असे जाहीर आवाहन करणेत आले होते. नागरीकांकडुन मीटर बसविणेबाबत कार्यवाही चालु असताना शासन निर्णय क्रं.मनपा-२०२४/प्र.क्रं.४० (७२) मंत्रालय दि.२६/०२/२०२४ अन्वये महापालिका क्षेत्रातील पाणी पुरवठ्याकरीता अत्यावश्यक कामे अंतर्गत नळ कनेक्शनकरीता पाणी मिटर पुरविणे र.रू.१२ कोटी इतका निधी मंजूर केलेला आहे.

सध्या सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामधील देयके तयार करणेचे कामकाज सुरू असुन मा.राज्य शासनाकडून मिटर बसविणेकरीता निधी मंजूर झालेने पाणी बिल देयका मध्ये सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रं.०९ दि.९/१०/२०२३ नुसार ज्या ग्राहकांचे पाणी मिट बंद आहे अशा ग्राहकाना किमान आकारणी अथवा मिटर सुव्यवस्थित असतानाची आकारणी याच्या दुप्पट दराने पाणीपट्टी आकारणी करणेची कार्यवाही करणे बाबतचा निर्णय ही सभा रद्द करीत असून, प्रचलित पध्दतीनुसारच देयके तयार करून नागरीकांना वितरीत करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

कार्यपुरवठा अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १०/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १२१ **दिनांक :- ०९/१०/२०२४**

विषय क्रमांक :- ०५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०८/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

पाणी पुरवठा देखभाल दुरुस्तीची कामे करित असलेल्या विविध १७ मक्तेदारांची एकुण ६० देयकांपोट रु.३,४४,२७,३७१/- इतक्या खर्चाची देयके थकीत आहेत.

अ.क्र	मक्तेदाराचे नांव	एकुण थकीत देयके संख्या	रक्कम
१	आसिफ शमशुद्दीन लष्करी, मिरज	६	३,३९,७३५/-
२	मे. उदय इंजिनिअरींग वर्क्स, मिरज	२	१,६४,३०१/-
३	मे. एम.एम. अग्रवाल, मिरज	१४	३९,३०,१७३/-
४	मे.नितीन एम. अग्रवाल, मिरज	२	१०,५९,३२८/-
५	मे. कृष्णा इंडस्ट्रीज, सांगली	१	६७,४५५/-
६	मे.लक्ष्मी इलेक्ट्रीकल्स, सांगली	५	१२,०९,७३८/-
७	मे.प्रथमेश इलेक्ट्रीकल्स, सांगली	५	३,६३,५९७/-
८	मे. योगीराज पॉवरटेक प्रा.लि.ठाणे	२	७,३७,२०१/-
९	मे.प्रिसिजन इंजिनिअर्स, मिरज	१	१,५८,८४२/-
१०	मे. लक्ष्मी सिव्हील इंजि.अॅण्ड प्रा.लि.	७	२,१६,१४,६९८/-
११	मे. सायली इरिगेटर्स, सांगली	२	६,२६,५४० /-
१२	श्री. विकास उदय जामदार, मिरज	२	४,०१,५६९/-
१३	मे. स्वामी समर्थ केमिकल्स, चाकुर	३	४,०२,३३३/-
१४	श्री. संदिप नेमगोंडा पाटील, मिरज	५	२७,३७,२१०/-
१५	श्री. संदेश आनंदा पाटील, सांगली	१	१,७१,५६७/-
१६	सौ. विद्या संदीप पाटील, मिरज	१	१,९८,८२७/-
१७	श्री. राहुल भगवान पाटील, सांगली	१	२,४४,२५७/-
	एकुण	६०	३,४४,२७,३७१/-

वरीलप्रमाणे थकीत देयके संबंधित ठेकेदार यांना वेळेत अदा झाल्यास चालु प्रशासक काळ व पुढील काळात निघणारे कामे आणखीन गतीने व वेळेत करुन पाणी पुरवठा सेवा नियमितपणे देणेस अधार होवु शकणार आहे. तरी वरीलप्रमाणे देयके थकीत असताना अत्यावश्यक सदरातील कामे विनातक्रार करीत आलेल्या वरील सांगली व मिरज विभागाकडे काम करित असलेल्या ठेकेदारांची प्रलंबित देयके महानगरपालिकेस १५ वे वित्त आयोगातुन प्राप्त झालेल्या अनुदानातुन पाणी व्यवस्थासाठी खर्ची करणेच्या शिल्लक रक्कमेतुन अदा करणे उचित होणार असुन यामुळे महानगरपालिकेचे देय दायित्व काही प्रमाणात कमी होवुन देखभाल दुरुस्तीचे कामास मदत होईल.

... २ ...

सबब त्याप्रमाणे पाणी पुरवठा सांगली विभागाकडे नियमित जलशुध्दीकरण केंद्र चालविणे, पंप हाऊस व फिल्टर हाऊस विभागाकडील दुरुस्त्या, पाईप लाईन्स टाकणे, बोअर मारुन पाणी सोय करणे, व्हॉल्व बदलणे/ बसविणे,मोठ्या स्वरुपातील गळत्या दुरुस्त्या, पाणी पुरवठा सुधारणा विषयक कामे करणे इत्यादी पाणी व्यवस्था बाबत कामे केलेल्या ठेकेदारांची थकित देयके १५ वा वित्त आयोगाच्या TIED अनुदानातुन पाणी पुरवठा याबाबीसाठी राखीव असणाऱ्या अनुदानातुन TIED grant खर्चाचा आराखडा खालील प्रमाणे सादर केलेला आहे.

अ) १५ वे वित्त आयोगाचे अनुदानातुन पाणी पुरवठा विभागाकडील प्रस्तावित होवुन पुर्ण / प्रगतीत /निविदा प्रक्रिया सुरु कामांचा तपशील व थकित देयकेसाठी प्रस्तावित तरतुद तपशिल

अ.क्र	कामाचे नांव	अंदाजित/झालेला खर्च
१.	कुपवाड -शामनगर व गर्व्हमेंट कॉलनी (विजय कॉलनी) येथे प्रत्येकी १५ लक्ष लि. क्षमतेच्या उंच टाक्या बांधणे, त्यासाठी आवश्यक डी.आय. पाईप पुरवुन खोदाई करणे, जोडणी करणे, चाचणी देणे इत्यादी.	३,७५,८५,०००/-
२.	जिल्हा परिषद लगत मिरज रोड पंप येथे वसंत कॉलनी व जयहिंद कॉलनी टाकी भरणेकामी नविन पंपींग मशिनरी बसविणे.	१४,६०,३६४/-
३.	सांगली व कुपवाड शहर परिसरातील विविध ठिकाणांच्या पाणी व्यवस्थेकरीता पाईप टाकणेच्या मागणी असलेल्या भागात नविन पाईप लाईन टाकणे.	२,००,००,०००/-
४.	विविध ठिकाणांच्या पाणी व्यवस्थेकरीता पाईप टाकणेच्या मंजुर कामासाठी तरतुद.	१,२४,३८,५१५/-
५.	कर्नाळ रोड जॅकवेल रॉ वॉटर पंप हाऊस येथील ट्रान्सफॉर्मर यार्ड व व्ही.सी.बी.रुम महापुरामुळे पाण्यात जात असल्याने ते उंचीवर चढवुन नविन बांधणे इत्यादी कामगिरी करणे.	२,६४,४४,९००/-
६.	माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र मुख्य संतुलन टाकी पासुन यशवंतनगर पंप हाऊस संपपर्यंत ३५० एम.एम. व्यासाची डी.आय.नविन मेन पाईप लाईन टाकणे.	१,३६,५८,४९७/-
७.	माळबंगला ५६ एम.एल.डी. जलशुध्दीकरण केंद्रसाठी नविन संप व पंप हाऊस बांधणे, अनुशंगिक कामगिरी करणे.	२,४८,८८,७०१/-
८.	विश्रामबाग ८० फुटी रस्ता आनंद चिंतामणी सोसा जवळ २० लक्ष लि. क्षमतेची उंच टाकी बांधणे त्यासाठी आवश्यक डी. आय.के.-९ पाईप पुरवुन खुदाई करणे, जोडणी करणे, चाचणी इ. अनुशंगिक कामगिरी करणे.	३,०६,७१,२४४/-
९.	मिरज वॉर्ड क्र.६ व कुपवाड वॉर्ड क्र.२ मधील नविन पाईप लाईन टाकणेची ८ कामे	६५,१७,९२९/-
१०.	गरजेच्या विविध आवश्यक ठिकाणी व्हॉल्व्ह बदलणे, पाणी पुरवठा सुधारणा करणे, टाक्यांची स्वच्छता, जलशुध्दीकरण केंद्रा उपांगाची नुतनीकरण विषयक कामांच्या एकुण २७ प्रलंबित देयकासाठी तरतुद.	७९,५७,६६२/-
११.	विश्रामबाग पोलिस हेडक्वार्टर्स् व सहयाद्रीनगर भागा करीता पाणी पुरवठासाठी स्वतंत्र असलेली जुनी कालबाहय झालेली पी.व्ही.सी. लाईन बदलुन यशवंतनगर टाकी ते चैत्रबन चौक लगत हेड क्वार्टर्स पाणी योजना संप (साठवण हौद) पर्यंत नविन ग्रॅव्हीटी मेन पाईप लाईन टाकणे.	४४,८२,१५१/-
	एकुण -	१८,९६,४४,४०३/-

ब) इतर थकित देयकेसाठी सद्याचा प्रस्ताव सादर -

अ.क्र	कामाचे नांव	अंदाजित खर्च	शेरा
१.	नविन पाईप लाईन्स टाकणे, बोअर मारुन पाणी सोय करणे, व्हॉल्व बसविणे ,जलशुध्दीकरण केंद्र, पंप हाऊस व फिल्टर हाऊस विभागाकडील नुतनीकरण कामे , पाणी पुरवठा सुधारणा विषयक कामांच्या एकुण ६० प्रलंबित देयकासाठी तरतुद.	३,४४,२७,३७१/-	पुर्ण कामांची प्रलंबित देयके
	एकुण -	३,४४,२७,३७१/-	

क) १५ वे वित्त आयोगाचे , महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनासाठी अनुदानातुन व मनपा निधीतुन पाणी पुरवठा विभागाकडील प्रस्तावित होवुन पुर्ण / प्रगतीत कामांचा तपशील व जादा दराच्या निविदेमुळे मनपा निधीतुन अतिरिक्त खर्च करावे लागणारे खर्चाचा तरतुद तपशिल -

अ.क्र	कामाचे नांव	अंदाजित व मंजुर / अंतिम खर्च	मंजुर जादा दराच्या निविदेसाठी मनपाचा अतिरिक्त करणेचा खर्च
१.	मनपा निधीतुन सांगली जॅकवेल येथे ३७० एच.पी.क्षमतेचा व्ही.टी.पंप बसविणे व गर्डर सक्षमीकरण करणे (अंदाजित खर्च रु.८३,६६,१७५/-)	रु ८३,६६,१७५/-	प्रलंबित पहिले रनिंग बिल रु.७०,८५,३५१/-
२.	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत मिरज रोड बुस्टर पंप हाऊस ते विश्रामबाग जयहिंद कॉलनी टाकी पर्यंतची रायझिंग मेन पाईप बदलणे.	रु.९१,३३,६२० /- (सुधारीत पाईप दर वाढमुळे मंजुर खर्च रु. १३८,७३,१४५/-)	रु.३७,०५,२७४/-
३.	१५ वे वित्त आयोग अनुदानातुन माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र मुख्य संतुलन टाकी पासुन यशवंतनगर पंप हाऊस संपपर्यंत ३५० एम.एम. व्यासाची डी.आय.नविन मेन पाईप लाईन टाकणे.	१,३६,५८,४९७/- (मंजुर खर्च रु.२,०५,४३,४४३/- ५०.४०७% जादाने)	रु.६८,८४,९४६/-
		एकुण	रु.१,७६,७५,५७१/-

उपरोक्त प्रस्तावित खर्चाच्या आराखड्यानुसार र.रु.१८,९६,४४,४०३/-, र.रु.३,४४,२७,३७१/-, र.रु.१,७६,७५,५७१/- अशी एकूण पाणी पुरवठा बाबींसाठींचा खर्च र.रु.२४,१७,४७,३४५/- इतका खर्च १५ व्या वित्त आयोगातील पाणी पुरवठा बाबींच्या बंधनकारक खर्चाच्या र.रु.२४.२९ कोटी या निधीतून करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

All pages signed,

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

पाणीपुरवठा अभियंता / मुलेक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १०/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १२२ **दिनांक :- ०९/१०/२०२४**

विषय क्रमांक :- ०६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०९/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सन २०२३-२४ करीता महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,शासन निर्णय क्र.-मनपा-२०२३/प्र.क्र.३२८(२४)/न.वि.-१६, दिनांक २५/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत एकूण ३९ कामांकीरता र.रु.१०.०० कोटी मात्र मंजूर झाले असून, सदर कामाची कार्यान्वयन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग असून, सदर शासन निर्णयान्वये शासन अनुदान १००% आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र.-मनपा-२०२३/प्र.क्र.३२८(२४)/न.वि.-१६, दि.१९/०६/२०२४ रोजीच्या शासन शुद्धीपत्रकान्वये मंजूर ३९ कामांपैकी काम क्र.१६,१७,३० व ३३ या र.रु.१.०५ कोटीच्या कामांना कार्यारंभ आदेश दिला नसल्यास सदर कामे रद्द करुन त्याऐवजी सदर शासन निर्णयातील खालील नमुद ०६ कामांना मान्यता देणेत आलेली आहे.

अ.क्र.	कामांचे नाव	र.रु (लक्ष)
१	प्रभाग क्र. ०५ बेडग रोड म्हैशाळ वेताळबा नगर येथे रस्त्यालगत गटार करणे	१५.००
२	प्रभाग क्र. २० विजय मुळे यांचे घरापासून ते शमु सय्यद यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रिटीकरण करणे.	१०.००
३	प्रभाग क्र. २० विठ्ठल चौक ते मिसाळ यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रिटीकरण करणे.	१०.००
४	प्रभाग क्र. ०५ श्रीराम बंगलो कॉलनी अंतर्गत रस्ता करणे.	१०.००
५	प्रभाग क्र. ०७ परमशेट्टी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल ते सांगली मिरज रोड पर्यंत दगडी गटार बांधकाम करणे.	२०.००
६	प्रभाग क्र. ०५ मधील (घाट रस्त्यावरील वांगी वाट रस्ता तसेच राजीव गांधीनगर मधील आंबी मळ्या कडे जाणारा रस्ता) रस्ते करणे.	४०.००
	एकूण	**१०५.००**

उपरोक्त नमूद एकूण ०६ कामांचा र.रु.१.०५ कोटी मात्रचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १०/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १२३ **दिनांक** :- ०९/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.३०/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

केंद्र शासनाने देशात पी.एम.ई-बस सेवा योजनेची घोषणा केली असून केंद्र शासनाच्या निवड सुचिनुसार महाराष्ट्र राज्यातील २३ शहरांची निवड झालेली आहे. त्यामध्ये सांगली मिरज कुपवाड शहर महापालिकेसाठी ई-बस सेवा योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन पी.एम.ई-बस योजने अंतर्गत वेळोवेळी व्ही.सी. मिटींगमध्ये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार Behind the meter bus power infrastructure plan व bus infrastructure depot plant तयार करणेत आलेला आहे व त्याप्रमाणे पी.एम.ई-बस सेवा सां.मि.कु.मनपा क्षेत्रामध्ये डेपोचे बांधकाम करणे कामी (Civil Work) र.रु.११,१३,७६,४९२/- तसेच पी.एम.ई-बस सेवासाठी विद्युतीकरणाचे काम र.रु.२,४४,४८,३१५/- मात्रच्या कामास तांत्रिक मान्यता घेवून शासनाकडून निधी मंजूर झालेला आहे. सदर कामांची एकूण रक्कम रु.१३,५८,२४,८०७/- मात्र होत आहे.

सबब मा.उप सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे दि.२४/०६/२०२४ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने मा.उपायुक्त तथा नोडल अधिकारी, पी.एम.ई-बस सेवा, सां.मि.कु.मनपा यांचे दि.२४/०६/२०२४ रोजीच्या पत्राप्रमाणे सदर प्रकल्पाची अंमलबजावणी विहित कालावधीत पुर्ण होण्याच्या दृष्टीने पी.एम.ई-बस सेवा योजने अंतर्गत स्थापत्य (Civil) व विद्युत (Electrical) कामांची निविदा प्रक्रिया केंद्रीय अर्थसहाय्य प्रत्यक्ष उपलब्ध होण्याची वाट न पाहता प्राथम्याने राबविणेबाबत दिलेल्या सुचनेनुसार तसेच त्यास अनुसरुन दि.२९/०७/२०२४ रोजीच्या मा. आयुक्त तथा प्रशासक, सां.मि.कु.मनपा यांचेकडून प्राप्त मंजूरीनुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यालयाकडून जाहिर प्रकटन क्रमांक ०१/२४-२५, काम क्र.११ मिरज येथील स.नं.९/२+३+४ येथे ई-बस सेवा बस डेपोचे बांधकाम करणे निविदा र.रु.८,७६,९८,०२५/-अंदाजित र.रु.११,१३,७६,४९२/- मात्रची शासनाच्या वेब साईटद्वारे ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आला आहे. त्याप्रमाणे प्राप्त मक्तेदार यांचा पहिला लिफाफा उघडून दुसरा लिफाफा उघडणेत आला आहे. तसेच विद्युत विभागामार्फत मनपा हद्दीतील पी.एम.ई-बस सेवाअंतर्गत बस डेपोचे विद्युतीकरण करणे (L.T.Side Infrastructure) अंदाजित र.रु.२,४४,४८,३१५/- मात्रच्या कामाचा पहिला लिफाफा उघडून दुसरा लिफाफा उघडणेची कार्यवाही सुरु आहे.

त्यानुसार निविदा दर मान्यतेचा प्रस्तावसाठी पुढील प्रक्रिया राबविणेकामी शासन हिस्यासाठी महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पामध्ये नवीन लेखाशिर्ष निर्माण करावे लागणार आहे. तरी यास अनुसरुन सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पामध्ये केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई- बस सेवा योजने अंतर्गत सां.मि.कु.महानगरपालिकेस मंजूर झालेल्या इलेक्ट्रीक बसेस परिचलन करण्याकरीता ई-बस सेवा बस डेपोचे बांधकाम व विद्युतीकरणाचे काम करणे, शासन हिस्सा असे नवीन लेखाशिर्ष निर्माण करुन सदर लेखाशिर्षावर जमा व खर्च बाजूस वरील नमुद केलेप्रमाणे केंद्र शासन हिस्सा (६०%) व राज्य शासन हिस्सा (४०%) मिळून र.रु.१३,५८,२४,८०७/- होत असुन सदर खातेवर र.रु.१४.०० कोटी तरतुद करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

डेप्युटी इंजिनियर

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)

प्रशासक तथा आयुक्त

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका